# जरा बारीक व्हा, पोलीस आयुक्तांसमोरच अजित पवारांनी अधिकाऱ्याला दिला सल्ला

■ पिंपरी, प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री** अजित पवार आज पिंपरी-चिंचवडच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड पोलिसांना पेट्रोलिंगचे वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे हे बाईकची किल्ली घेण्यासाठी गेले असता अजित पवारांनी हसत हसत तब्येत कमी करण्याचा सल्ला दिला. या सल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

या दौऱ्यात अजित पवारांनी तळवडे - जॉगिंग ट्रॅक व नव्याने विकसित केलेल्या उद्यानाचे उद्‌घाटन केले. याबरोबरच पिंपरी महानगरपालिकेने उभारलेल्या हॉकी अकॅडमीचे उद्‌घाटन त्यांनी केले. यावेळी हॉकी खेळण्याचा आनंदही त्यांनी लुटला. तसेच त्या ठिकाणी या असलेल्या खेळाडूशी चर्चाही केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीत फायर फायटर बाईक आणि पोलिसांना गस्त घालण्यासाठी अत्याधुनिक दुचाकीच्या वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पोलीस आयुक्तालयातील डीसीपी डॉ. काकासाहेब डोळे हे व्यासपीठावर दुचाकीची प्रातिनिधीक चावी स्वीकारण्यासाठी आले. त्यावेळी त्यांच्याकडे पाहून अजित पवारांनी चावी देताना सर्वांसमोरच 'जरा बारीक व्हा' असा सल्ला दिला. यामुळे पुन्हा एकदा अजित पवारांचा स्पष्टवक्तेपणा पाहायला मिळाला. काकासाहेब डोळे चावी घेऊन स्टेजवरुन खाली उतरल्यानंतर अजित पवार यासंबंधी पोलीस आयुक्तांसोबतही या विषयावर चर्चा करत होते. पोलिसांनी तंदरुस्त राहावं यासाठी आपण आर आर पाटलांच्या काळात पोलिसांसाठी फिटनेस भत्ता सुरु केला याची आठवणही त्यांनी करुन दिली. या कार्यक्रमात पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, पालिका अधिकारी उपस्थित होते.

# भगवंत मान यांनी घेतली मुसेवालाच्या कुटुंबाची भेट

■ मानसा

**लोकसभेचे** माजी खासदार आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हे आज सकाळी मानसा येथे पोहोचले आणि त्यांनी येथे पंजाबी गायक सिद्धू मुसेवालांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

सिद्धू मूसेवाला यांची हत्या करणाऱ्या गुन्हेगारांना सोडले जाणार नसल्याचे आश्वासन त्यांनी पीडित कुटुंबाला दिले.मुसेवालांच्या हत्येनंतर मानसा येथे काहीकाळ तणावाचे वातावरण पसरले होते. सरदुलगडचे आपचे आमदार गुरप्रीत सिंह शुक्रवारी सिद्धू मुसेवाला यांच्या घरी पोहोचले होते. ते येताच लोकांनी जोरदार निषेध व्यक्त केला आणि पंजाब सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. यावेळी आमदाराने हात जोडून लोकांची माफीही मागितली. मात्र, लोकांनी त्यांना घरात जाऊ दिले नाही. तेथे मुख्यमंत्री भगवंत मान मुसेवालांच्या कुटुंबियांची भेट घेण्यापूर्वीच संपूर्ण गावाचे पोलीस छावणीचे स्वरुप आले होते, अशा तणावपूर्ण परिस्थितीत मानसा येथे भगवंत मान यांनी आज सकाळी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

# जळगावात दगडाने ठेचून तरुणाचा निर्घृणपणे खून



■ जळगाव, प्रतिनिधी

**जळगाव** शहराच्या कासम वाडी परिसरातील मासळी बाजारा लगतच्या मोकळ्या मैदानात एका २७ वर्षीय तरुणाचा दगडाने ठेचून निर्घृणपणे खून करण्यात आला आहे. उल्लेखनीय की,ज्याचा खून करण्यात आला तो तरुणही एका खुनाच्या प्रकरणातील आरोपी होता व त्याची काही दिवसांपूर्वी जामिनावर सुटका झाली होती. या खूनप्रकरणी पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेतले आहे.

शहरातील कासम वाडी-मासुम वाडी परिसरातील मासळी बाजार जवळच असलेल्या मोकळ्या मैदानात आज भल्या पहाटेच एक तरुण मृतावस्थेत पडून असल्याचे लोकांना दिसताच पोलिसांना खबर करण्यात आली. दरम्यान जसे उजाडले तशी मयताची ओळख पटली.सागर वासुदेव पाटील (२७)राहणार ईश्वर कॉलनी असे त्याचे नाव निष्पन्न झाले त्याचबरोबर सागर हा शहरातील एका खून प्रकरणातील आरोपी असल्याचे व त्याची काही दिवसांपूर्वीच जामिनावर सुटका झाली असल्याची माहिती मिळाली. सागर पाटील यास रात्री १२ ते १ वाजेच्या दरम्यान कोणीतरी बोलावले होते म्हणून तो घराबाहेर गेल्याचे त्याचा घरच्यांनी सांगितले.आणि सकाळी त्याच्या खुनाची बातमी समजताच सारे घर सुन्न झाले. सागर याच्या डोक्यात दगड टाकून व दगडाने ठेचून त्याचा खून करण्यात आला आहे.

# जुहू अत्याचार प्रकरण गुडाप्पाला फाशीची शिक्षा

■ मुंबई

**मुंबईतील** दिंडोशी न्यायालयाने गुडाप्पा चिन्नाटंबी देवेंद्र याला अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी फाशीची शिक्षा सुनावली आहे. त्याने एप्रिल २०१९ मध्ये जुहू परिसरातील एका ९ वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून तिचा मृतदेह गटारात फेकला होता. त्यानंतर दिंडोशी न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे. एप्रिल २०१९ मध्ये ९ वर्षाच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार आणि हत्या करण्यात आली होती. त्यानंतर गुडाप्पा चिन्नाटंबी देवेंद्र या आरोपीला दिंडोशी न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. पण यानंतर आरोपी उच्च न्यायालयात अपील करू शकणार आहे. याआधी दोन दिवसांपूर्वी दिंडोशी न्यायालयाने साकीनाका बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली होती.

# बेलापूर-उरण लोकल सेवा सप्टेंबरमध्ये सुरू होणार?

■ मुंबई

**मध्य** रेल्वे मार्गावरील बहुचर्चित बेलापूर- उरण रेल्वे मार्गावर आता येत्या सप्टेंबर महिन्यात लोकलसेवा सुरू होण्याची दाट शक्यता आहे. या मार्गावरील पहिल्या टप्प्यातील बेलापूर ते खारकोपर पर्यंतची रेल्वेसेवा दोन वर्षापूर्वीच सुरू झाली आहे. आता उर्वरित खारकोपर ते उरण या मार्गाचे कामही शीघ्र गतीने सुरू आहे.ही रेल्वे सेवा सुरू झाल्यावर मुंबईला आणखी २७ किलोमीटरचा चौथा नवीन रेल्वे मार्ग उपलब्ध होणार आहे.

उरण ते बेलापूर दरम्यान लोकल सुरू करण्याची घोषणा १९९७ मध्ये करण्यात आली होती. मात्र यात अडथळे निर्माण झाल्याने ही घोषणा लांबणीवर पडली होती. मात्र २०१८ मध्ये बेलापूर ते नेरुळ ते खारकोपर हा १२.४ किमीचा मार्ग सुरू झाला. मात्र पुढील १४.६ किलोमीटरच्या रेल्वे मार्गाचे काम शीघ्र गतीने सुरू असल्याने ते सप्टेंबरमध्ये पूर्ण होऊन या मार्गावर लोकलसेवा सुरू होण्याचा अंदाज मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिलकुमार लाहोटी यांनी व्यक्त केला आहे. आतापर्यंत या मार्गाचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गाला जे एन पीटी आणि नवी मुंबई विमानतळही जोडले जाणार आहे. त्याचप्रमाणे या मार्गावर पनवेल, जसई, जेएनपीटी क्रॉसिंग लाईन असणार आहे. या मध्य रेल्वेच्या चौथ्या मार्गावर १० स्थानके असणार आहेत. यात दोन मोठे पूल, ४६ छोटे पूल, ४ अंतर्गत पूल असणार आहेत.


## नोटीस

**मी, श्रीमती कुलसुम शेरव अहमद कुरवले** राहणार A-1/17 ज्ञानेश्वर नगर को. ऑप. हौ. सोसायटी, वडाळा, मुं.३१. माझ्या नावे असलेले सोसायटीचे शेअर्स सर्टिफिकेट नंबर 071 ते 075 गहाळ झालेली आहेत. कोणाला सापडल्यास वरील पत्त्यावर संपर्क करावा. BYP

**MOB. NO.:-08983219719**

## टेंडर नोटिस

**कॅटरर्स नेमणे**

संस्थेच्या दोन सभागृहाच्या २ वर्ष कॅटरींग व डेकोरेशनकरिता अनुभवी कॅटरर्स पाहिजेत. त्याबाबतचे छापील अर्ज संस्थेच्या कार्यालयात दि. १३ जून २०२२ ते २० जून २०२२ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत मिळतील. दि. २० जून २०२२ सायंकाळी ६ वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. मो. ७०४५१६३९७४

श्रीसंत सेना नाभिक समाज आणि श्री. विठ्ठल रखुमाई मंदिर ट्रस्ट, स्वामी विवेकानंद मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई- ५०

आपले नम्र
सही/-
(संतोष बिडवे)
चिटणीस


# एसी लोकलमध्ये ११ हजार फुकट्या प्रवाशांवर कारवाई

■ मुंबई

**एसी** लोकल प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन तिकीट दरात ५० टक्के कपात करण्यात आली. त्यामुळे मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील वातानुकूलित लोकल गाडीला प्रतिसाद वाढत आहे. मात्र, त्याचवेळी याचाच फायदा घेऊन या लोकलमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्यांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे आता रेल्वे प्रशासनही याबाबत खडबडून जागे झाले असून विनातिकीट प्रवाशांविरोधात विशेष मोहीम हाती घेत गेल्या पाच महिन्यांत मध्य आणि पश्चिम रेल्वेने ११ हजार ७११ विनातिकीट प्रवाशांवर कारवाई केली असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, एसी लोकलच्या पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट-विरार दरम्यान दररोज ३२, तर मध्य रेल्वेवर ५६ फेऱ्या होतात. अल्प प्रतिसादामुळे एसीच्या सीएसएमटी ते पनवेल हार्बर आणि ठाणे ते वाशी, पनवेल या ट्रान्स हार्बरवरील वातानुकूलित लोकल फेऱ्या बंद करण्यात आल्या. ५ मेपासून वातानुकूलित लोकलच्या तिकीट दरात कपात केल्यानंतर एसी लोकलला प्रतिसाद वाढू लागला.


## जाहीर सूचना

माझ्या अशील सौ. माया नाराईणदास असरानी यांच्या वतीने गाव मालाड, तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हाच्या सर्व्हे क्र. ४२२ च्या सीटीएस क्र. ११९५ धारण केलेल्या वासरी हिल, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०००६२ येथे स्थित "आकांक्षा ॲक्मे को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड" या संस्थेमधील आकांक्षा क्र. १ इमारतीच्या ए विंग, ४ थ्या मजल्यावरील सदनिका क्र. ४०३, कार्पेट क्षेत्रफळ ३८९.५० चौ.फू. समतूल्य ३६.२० चौ.मीटर्स ही सदनिका, जी त्यांनी सौ. नेहा गौर यांना विक्री करारपत्र अनुक्रमांक बीआरएल-४-७६४६-२०२२ दिनांक ०६.०५.२०२२ नुसार विक्री केली होती, तिच्या शीर्षकाची मी तपासणी करीत आहे.

सौ. माया नाराईणदास असरानी यांनी आम्हाला असे सूचित केले आहे की, पूर्वीची साखळी करारपत्रे म्हणजेच श्री. अल्बर्ट जॉन सेबास्टिअन मिस्किटा, एका भागाचे जमीन मालक म्हणून, १) मे. ॲक्मे ड्वेलर्स प्रा. लि., २) सजावट ड्वेलर्स प्रा. लि., ३) प्रज्ञगण हौसिंग कॉम्प्लेक्सेस प्रा. लि., ४) ॲक्मे रेसिडेंशियल कॉम्प्लेक्सेस प्रा. लि., ५) तृष्णा ड्वेलर्स प्रा. लि., दुसऱ्या भागाचे पुष्टी करणारे पक्ष, आणि श्री. चंद्रप्रकाश चौहान, तिसऱ्या भागाचे भोगवटादार यांच्या दरम्यान बनलेले, योग्यरित्या शिक्का असलेले आणि नोंदणीकृत (नोंदणीकरण क्र. बीबीजे/११४१६/२००१ दिनांक २५ ऑक्टोबर, २००१) दि. २५.१०.२००१ रोजीचे पर्यायी निवासाकरिताचे करारपत्र हरवले आणि/किंवा गहाळ झाले आहे.

माझ्या अशिलाने हरविलेल्या/गहाळ झालेल्या नोंदणीकरण क्र. बीबीजे/११४१६/२००१ दिनांक २५ ऑक्टोबर, २००१ धारण केलेल्या दि. २५.१०.२००१ रोजीच्या पर्यायी निवासाकरिताच्या करारपत्रासंदर्भात गोरेगाव पोलीस स्थानक येथे दि. ०३.०६.२०२२ रोजी एनसीआर क्र. १९२६/२०२२ धारण केलेला एफआयआर केला आहे.

कोणा व्यक्तीचे सदर जागेच्या संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, परवाना, भेट, गहाणवट, प्रभार, ताबा, भाडेपट्टी, नियुक्ती, धारणाधिकार, मालकी, हस्तांतरण, वापर, वहीवाट, बोजा कशाही प्रकारे किंवा अन्यथा कोणताही दावा किंवा हक्क असल्यास आणि/किंवा उपरोल्लेखित कागदपत्रांचा ताबा असल्यास आणि/त्यांना याद्वारे त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याच्या हिश्शाबाबत, जर असल्यास, सर्व सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरुपात सूचित करावे, असे न केल्यास, सदर जागेच्या संदर्भात कोणताही दावा किंवा समस्या नाही असे समजण्यात येईल आणि सदर कागदपत्रे दुष्प्राप्य आणि/किंवा हरविले आहे असे मानले जावे.

कोमल एन. जैन
वकील (उच्च न्यायालय)
दुकान क्र. ६०, तळ मजला,
अप्पर लेव्हल, एव्हरशाईन मॉल, माईंडस्पेस,
मालाड (पश्चिम), ४०००६४.

## महावितरण — जाहीर सुचना

डोंबिवली पश्चिम विभागातील वीज ग्राहकांना कळविण्यात येते की, शनिवार दि. ०४.०६.२०२२ रोजी खालील वीज वाहिन्यांचा वीज पूरवठा महत्वाच्या दुरूस्तीचे काम व देखभालीसाठी खाली दर्शविलेल्या वेळेत बंद राहील. तरी संबधीत वीज ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे ही विनंती.

| उपकेंद्र | फिडर | वेळ | प्रभावित क्षेत्र | कामाचा तपशील |
|---|---|---|---|---|
| २२ केव्ही आनंदनगर स्विचिंग स्टेशन | गावदेवी फिडर | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० | मोठागाव, वेताळ नगर, लोटेवाडी, दीप भूषन, गावदेवी मंदीर, देवीचा पाडा, सत्यवान चौक, कलावती मंदीर | अतिमहत्वाचे दुरूस्ती काम करण्यासाठी |
| २२ केव्ही आनंदनगर स्विचिंग स्टेशन | जय हिंद कॉलनी | सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० | जय हिंद कॉलनी, जोशीवाडी, जाधववाडी लालसन, मॉडेल स्कुल परीसर, गोपी मॉल, रोकडे बिल्डिंग, वेलकणी स्कुल, डोन बोस्को स्कुल | अतिमहत्वाचे दुरूस्ती काम करण्यासाठी |

कार्यकारी अभियंता
डोंबिवली (ना) विभाग म.रा.विज.वितरण कं.मर्यादित

## भारतीय स्टेट बँक (SBI)

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: **sbi.igr@alankit.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्डप्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०१००३४८६ | बीआर अनुराधा शंकर | ३३० | १०४८४० | १०४८४१ | ७३९८७६७३७१ | ७३९८७६७७०० |
| २ | ०७१२८००२ | रमेश कुमार | ६०० | २३९०९९ | २३९०९९ | ७४६४८६३६६१ | ७४६४८६४२६० |
| ३ | ००७७५९२९ | संतोष कुमार चौरसिया गीता चौरसिया | ६९० | ५३२८२ | ५३२८३ | ७३८६१२७२८१ | ७३८६१२७९७० |
| ४ | ०११२४५४९ | संतोष कुमार चौरसिया गीता चौरसिया | ५०० | ११७५२७ | ११७५२७ | ७४०५०४३१२१ | ७४०५०४३६२० |
| ५ | ०३२४९१९५ | जितेंद्र कोचर | ५०० | २१७५१९ | २१७५१९ | ७४५६१६४५९१ | ७४५६१६५०९० |
| ६ | ०१६६३५७१ | रवींद्र अनंत सुर्वे अनंत गणपत सुर्वे | ५०० | १४९७१८ | १४९७१८ | ७४२१५२४०११ | ७४२१५२४५१० |
| ७ | ०२१३७४७० | विजय सोंधी विक्रम सोंधी | ५०० | १७४९१६ | १७४९१६ | ७४३४४०५४११ | ७४३४४०५९१० |
| ८ | ०१८५२१३६ | जी आर सत्यनारायण | ५०० | १५७२६८ | १५७२६८ | ७४२५३५६९०१ | ७४२५३५७४०० |
| ९ | ००८३४१७० | शिव राम गोनबरे सविता शिवराम गोनबरे | ३० | ७६३९५ | ७६३९५ | ७३९१९४६०७१ | ७३९१९४६१०० |
| १० | ००७०५४१२ | दीपक कुमार घोष सोमदत्त घोष | ५३० | २७६०२ | २७६०३ | ७३७९५१२३२१ | ७३७९५१२८५० |
| ११ | ००७१२३४३ | ब्रज बिहारी चौबे रूनी चौबे | ५३० | ३०३१३ | ३०३१४ | ७३८०२७२४९१ | ७३८०२७३०२० |
| १२ | ०३०७९२२९ | सीएच विजया लक्ष्मी | १० | २११५०० | २११५०० | ७४५३४०६६५१ | ७४५३४०६६६० |
| १३ | ०७५०२५२३ | सुरजीत सिंह | २४० | ६३०२५९३ | ६३०२५९३ | ८०५८०९६५५२ | ८०५८०९६७९१ |
| १४ | ०१२८२७८९ | बिमल मित्रा गायत्री मित्रा | ५०० | १२७११४ | १२७११४ | ७४०९९२१३६१ | ७४०९९२१८६० |
| १५ | ००८०४८३३ | जैतुन बक्सला | ५०० | ६४०२२ | ६४०२२ | ७३८८७२१९११ | ७३८८७२२४१० |
| १६ | ००९०००० | मिस राधा खन्ना कैलाश रानी | ६३० | ९९५१४ | ९९५१५ | ७३९७५०२४८१ | ७३९७५०३११० |
| १७ | ००७१७५२३ | आलोक शाह | ७६० | ३२३२७ | ३२३२८ | ७३८०८४०१४१ | ७३८०८४०९०० |
| १८ | ०७४०३७२२ | दीपा वलसाराज | २२० | ६२०४४२९ | ६२०४४२९ | ८०१०१४३७८३ | ८०१०१४४००२ |
| १९ | ०२६५६४३२ | आशुतोष पांडेय | ६०० | २०६८६५ | २०६८६५ | ७४५०९११६०१ | ७४५०९१२२०० |
| २० | ०७१०४७३० | निरंजन कुमार | ३२० | २२८८८८ | २२८८८९ | ७४६०४२८७२१ | ७४६०४२९०४० |
| २१ | ०२२८६८९२ | पूर्णेंदु पॉल | १५०० | १८८८१० | १८८८१० | ७४४१५७२८७१ | ७४४१५७४३७० |
| २२ | ०३०३९९३० | वेलंकी उषा रानी के एल एन राव | ५०० | २१०६३८ | २१०६३८ | ७४५२९०६७३१ | ७४५२९०७२३० |
| २३ | ०३०३०१२२ | वेलंकी उषा रानी के एल एन राव | १५०० | २१०३७८ | २१०३७८ | ७४५२७४३४२१ | ७४५२७४४९२० |
| २४ | ०३०५८९६४ | के एल एन राव वी उषा रानी | १००० | २१०९८१ | २१०९८१ | ७४५३१३३०९१ | ७४५३१३४०९० |
| २५ | ०१०५२०५६ | वेलंकी उषा रानी के एल एन राव | १००० | ११२४३८ | ११२४३८ | ७४०२४८१९९१ | ७४०२४८२९९० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ०४.०६.२०२२

समभागांची संख्या: १४४९०
स.प्रमाणपत्रांची संख्या: ३२

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वत्रिक **निवडणूक - सन २०२२**

**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिकेच्या आगामी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक सन-२०२२ करीता मतदार याद्यांची छपाई करुन पुरविणेबाबतच्या कामाकरीता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा प्रपत्र निविदेच्या अटी व शर्ती ई-टेंडरींग व त्याद्वारे करावयाची नोंदणी या संदर्भातील कार्यपद्धती व निविदेची इतर माहिती ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. मात्र प्रस्तूत निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर शनिवार, दि.०४.०६.२०२२ ते शुक्रवार, दि.१०.०६.२०२२ रोजी दुपारी १५.३० वाजेपर्यंत केवळ ई-टेंडरींग पद्धतीने सादर करावयात. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा दाखल करणे आवश्यक आहे. प्राप्त निविदा शनिवार, दि.११.०६.२०२२ रोजी १५.३० वाजता किंवा त्या दिवशी शक्य झाले नाही तर लगत नंतरच्या कार्यालयीन कामकाजाचे दिवशी १५.३० वाजता उघडण्यात येतील. निविदाकर अथवा त्यांचे प्रतिनिधी निविदा उघडण्याचे वेळी उपस्थित राहू शकतात. प्राप्त झालेल्या कोणत्याही निविदा पूर्णत: किंवा अंशत: स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क मा. महापालिका आयुक्त यांचेकडे असतील. नामंजूर निविदाकारांशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/२०५/२०२२-२३ Sd/-
दिनांक :- ०३/०६/ २०२२ उप-आयुक्त (निवडणूक)
Pls Visit our official web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे.
www.thanecity.gov.in

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

## वसई-विरार शहर महानगरपालिका

महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती,
गुरुवार ते बुधवार, मे १९-२५, २०२२/वैशाख २९-जेष्ठ ४, शके १९४४

**शुध्दिपत्र**

**सुचना**

**जा.क्र.व.वि.श.म/न.र/शा.२४२/२०२१-२२**

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम-१९६६ कलम ३७ अन्वये)**

जा.क्र. वविशम/नर/शा. १२१६/२०२०-२१ महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन संकिर्ण सूचना व जाहिराती, गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २१-२७, २०२१ अन्वये वसई विरार उपप्रदेशाच्या विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) तरतुदीनुसार विकास आराखडयामध्ये मौजे-धोवली, स.नं-१०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, नविन स.नं-२५९ (जुना स.नं-२९३) येथील २० मी.डी.वी रोड आरक्षण वगळून नवीन १८ मी. डी.पी रोड प्रस्तावित करण्यांचे अधिसूचित केले आहे.

सदर सूचनेच्या मजकुरात ''विकास आराखडयामध्ये मौजे-धोवली, स.नं-१०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, स.नं-२९३ येथील २० मी.डी.वी रोड आरक्षण वगळून नवीन १८ मी. डी.पी रोड प्रस्तावित करण्यास प्रशासकी ठराव क्र.२०३ दि.११/०५/२०२२ मान्यता दिलेली आहे.''

वगळण्यात येणाऱ्या आरक्षणाची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) डि. पी. रोड : २० मी., डी. पी. रोड
२) डि. पी. आरक्षण क्षेत्र : १६००.०० चौ.मी.
३) स्थळ अहवाल : मौजे-धोवली, स.नं-१०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, स.नं-२९३
४) जमिन मालक : श्री. रमेश गुजर, श्री. अविनाश गुजर व ग्रामपंचायत सांडोर

प्रस्तावित करण्यात येणाऱ्या आरक्षणाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) डि.पी. रोड : १८ मी. डी.पी रोड
२) डि.पी. आरक्षण क्षेत्र : ३८६६.०० चौ.मी.
३) स्थळ अहवाल : मौजे-धोवली, स.नं-३/१ व स.नं- १०४/B
४) जमिन मालक : श्री. रमेश गुजर, श्री. अविनाश गुजर व श्री. सौरभ गुजर

ऐवजी ''विकास आराखड्यामध्ये मौजे-धोवली, स.नं-१०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, नविन स.नं-२५९ (जुना स.नं-२९३) येथील २० मी.डी.वी रोड आरक्षण वगळुन नवीन १८ मी. डी.पी रोड प्रस्तावित करण्यास मान्यता दिलेली आहे. वगळण्यात येणाऱ्या आरक्षणाची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) डि.पी. रोड : २० मी. डी.पी. रोड
२) डि.पी. आरक्षण क्षेत्र : १६००.०० चौ.मी.
३) स्थळ अहवाल : मौजे-धोवली, स.नं-१०४/B, १०४/A/२ व मौजे-सांडोर, नविन स.नं-२५९(जुना स.नं-२९३)
४) जमिन मालक : श्री. रमेश गुजर, श्री. अविनाश गुजर व ग्रामपंचायत सांडोर

प्रस्तावित करण्यात येणा-या आरक्षणाची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) डि.पी. रोड : १८ मी. डी.पी रोड
२) डि.पी. आरक्षण क्षेत्र : १९४०.०० चौ.मी.
३) स्थळ अहवाल : मौजे-धोवली, स.नं-३/१ व स.नं- १०४/B
४) जमिन मालक : श्री. रमेश गुजर, श्री. अविनाश गुजर व श्री. सौरभ गुजर

असे वाचावे. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन संकिर्ण सूचना व जाहिराती, गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २१-२७, २०२१ या बाबतचे हे शुध्दीपत्रक आहे..

सही/-
अनिलकुमार खंडेराव पवार
आयुक्त,
वसई-विरार शहर महानगरपालिका.

विरार,
दिनांक:

## Government of Maharashtra
## Forest Department
## Mumbai Mangrove Conservation Unit- Mumbai

68/B, Kamgarnagar, Kurla (E), Mumbai - 400024.
Email- dfommcu@gmail.com
**Parent Portal: http://mahatenders.gov.in**
**e-tender**

**Tender Notice No. DFO/MMCU/02/2022-23**

On line lender Forms in B-1 Format, for the following work is invited by the Divisional Forest Officer, Mumbai Mangrove Conservation Unit. Mumbai.68/B. Kamgarnagar, Kurla (E), Mumbai-400024 from the contractors registered with the Government of Maharashtra in Appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website **http://mahatenders.gov.in** from **07/06/2022 11.00 am to 01/07/2022 03.00 pm.** Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download lender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no. **022-25220097** during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available in the above said website.

If any assistance is required regarding e-Tendering (upload / download) please contact NIC Help Desk number: **1800 3070 2232**

| Sr. No. | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non - Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 |
| 1 | Construction of RCC Residential building at Kopari for Mumbai Mangrove Conservation Unit | 2,61,26,560/- | 1,50,000/- online net banking mode | 12 Months (including Monsoon) | Rs. 2000/-+ GST@12% online net banking mode |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the Website. If any changes made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.

2) Right to reject any or all the tenders without assigning any reason thereof is reserved.

Sd/-
**Divisional Forest Officer,**
**Mumbai Mangrove Conservation Unit**

आरओसी-२०२२-२३/क्र.-५/सी १०८५